# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## रविवार दिनांक २२ जानेवारी २०१२

रविवार दिनांक २२ जानेवारी २०१२ रोजी कै. ॲड. मधुसूदन करमरकर व्यासपीठावर सकाळी १० ते १ या वेळेत स्त्री संत जीवनावर 'मुक्ताई' हा एकपात्री प्रयोग सादर करण्यात आला. दुपारी ३ ते ५ या वेळेत ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर आधारित 'सत्यशोधक' हे नाटक सादर करण्यात आले. त्याचवेळी कै. कृ. प्र. खाडिलकर व्यासपीठावर दुपारी २ ते ४ या वेळेत 'नाट्यसंगीता' चा कार्यक्रम सादर करण्यात आला. कै. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यासपीठावर सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत 'आजचे नाटक खरच आजचे आहे का ! हा परिसंवाद संपन्न झाला. त्यानंतर दुपारी २ ते ४ या वेळेत 'नियोजित व मावळते संमेलन अध्यक्षांची मुलाखत' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर कुणीहि यावे आणि सादर करावे हा कार्यक्रम संपन्न झाला.

नटवर्य कै. गणपतराव बोडस व्यासपीठ (बालगंधर्व नाट्यगृह, मिरज) येथे सकाळी ९ ते २ या वेळेत मध्यवर्तीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या एकांकिका स्पर्धेतील अंतीम फेरीतील नाशिक शाखेची 'पाणीपुरी, अहमदनगर शाखेची 'जाहला सोहळा अनुपम', अकोला शाखेची 'शांडिल्य', सोलापुर उपनगर शाखेची 'वीसचं गणित' , सांगली शाखेची 'गोष्टी घराकडील' या एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यानंतर दुपारी २ ते ५ या वेळेत 'तुमची आमची जमली गट्टी' आणि 'ये रे ये रे पावसा' ही बालनाट्ये सादर करण्यात आली. दुपारी ४ ते ५ या वेळेत 'पाऊल मराठी' हा लोकगीत आणि नृत्याचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

आद्य नाटककार कै. विष्णूदास भावे व्यासपीठावर सायं. ७.३० वा. नाट्यसंपदा निर्मित 'वा-यावरची वरात' हे नाटक सादर करण्यात आले. त्याला रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला.